क्रमांक दिनांक : २५ एप्रिल, २०१७

# घोषणा

## विषय:-पुणे जिल्हाकेंद्रावरील बैठकव्यवस्थेबाबत

आयोगामार्फत आयोजित स्पर्धा परीक्षांकरीता अर्ज करणा-या उमेदवारांच्या संख्येत मागील काही वर्षापासून लक्षणीय वाढ झाली आहे. स्पर्धा परीक्षेच्या तयारीकरीता मोठया संख्येने उमेदवार पुणे येथे वास्तव्यास असतात व त्यामुळे पूर्व परीक्षांकरीता फार मोठ्या प्रमाणावर उमेदवार पुणे जिल्हाकेंद्राची निवड करतात.

२. पुणे जिल्हाकेंद्रावरील उमेदवारांचे प्रचंड प्रमाण व शाळा/महाविद्यालयांमधील वर्ग खोल्याचे उपलब्धतेवरील मर्यादा यांचा विचार करता उमेदवारांच्या बैठकव्यवस्थेकरीता पुणे शहर व परिसरातील शाळा/महाविद्यालये अपुरी पडत आहेत. यास्तव, आयोगास पुणे जिल्ह्यातील भोर, पुरंदर, खेड, मुळशी या तालुक्यांतील शाळा/महाविद्यालयांवर उमेदवारांची बैठक व्यवस्था करणे नाईलाजास्तव भाग पडत आहे. तथापि, उमेदवारांस सदर ठिकाणच्या उपकेंद्रावर पोहोचण्यास, अंतर व अपु-या वाहतूक सुविधांमुळे, अडचणींचा सामना करावा लागतो व उमेदवारांचा परिक्षेचे दिवशी बहुमुल्य वेळ वाया जात असल्याचे व त्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे. उमेदवारांची बैठक व्यवस्था शक्यतो त्यांचे निवडीप्रमाणे करण्याचा आयोगाचा प्रयत्न असला तरीही त्याला मर्यादा आहेत. याबाबत कमाल किती उमेदवारांची सोय पुणे केंद्रावर करता येवू शकेल याचा आढावा घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने स्पर्धा परिक्षा घेण्यासाठी योग्य अशा सोयी सुविधांयुक्त शाळा खोल्यांची पुणे शहरातील उपलब्धता व त्यावरील मर्यादा विचारात घेवूनच उमेदवारांना परिक्षा केंद्राची निवड करावी लागेल.

३. उपरोक्त परिस्थिती विचारात घेऊन, असा निर्णय घेण्यात आला आहे की, यापुढे आयोगामार्फत आयोजित सर्व स्पर्धा परीक्षांकरीता पुणे जिल्हाकेंद्रासाठी, प्रथम अर्ज सादर करणा-या, जास्तीत जास्त ४०,००० उमेदवारांची बैठक व्यवस्था करण्यात येईल. या मर्यादेनंतर उमेदवारांना पुणे जिल्हाकेंद्र निवडता येणार नाही. सदर क्षमता/मर्यादा पूर्ण झाल्यानंतर, उर्वरित उमेदवारांना अन्य उपलब्ध जिल्हाकेंद्राचा पर्याय निवडावा लागेल. अथवा जिल्हाकेंद्राची निवड न करणा-या उमेदवारांची बैठकव्यवस्था नजीकच्या जिल्हाकेंद्रावर करण्यात येईल.

ठिकाण : मुंबई

सु. ह. अवताडे
उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग